क्रमांक : ८२१७/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई,
दिनांक : २० एप्रिल, २०२२

**संदर्भ :- सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. एस.आर.व्ही. - १०८९ / प्र.क्र.२४/८९/बारा, दिनांकित २६ नोव्हेंबर, १९९०.**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व लिपिक-टंकलेखक संवर्गातील (रोखपाल, देयक लिपिक, गोपनिय लिपिक, मुख्य टंकलेखक, लिपिक-टंकलेखक) कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, कार्यालयीन कामकाज पार पाडत असताना लिपिक-टंकलेखक संवर्गातील काही कर्मचारी टंकलेखनाचे काम करीत नाहीत किंवा काम करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

विधिमंडळाच्या सत्र कालावधीमध्ये अतिशय तातडीची व महत्वाची कामे, विहित मर्यादेत पूर्ण करावयाची असतात तसेच विधिमंडळाच्या विविध समित्यांच्या बैठका, दौरा व अहवालासंदर्भातील कामे त्याचप्रमाणे, इतर प्रशासनीक कामांचा निश्चित वेळेत निपटारा होणे आवश्यक असते. तथापि, लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचारी टंकलेखनाचे काम करीत नसल्यामुळे कामकाजात अडचण निर्माण होऊन विलंब होत असल्याचे काही कक्षांकडून अवगत करण्यात आले आहे.

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक या पदांचे एकत्रिकरण करून लिपिक-टंकलेखकाच्या कार्यपध्दती विशद केल्या आहेत. सर्व लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांनी या शासन निर्णयाचे अवलोकन करावे. या शासन निणर्यानुसार या सचिवालयातील "लिपिक-टंकलेखक" सवंर्गातील सर्व कर्मचाऱ्यांनी लिपिकाची तसेच टंकलेखनाची जबाबदारी पार पाडणे अपेक्षित आहे. या परिपत्रकान्वये लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचारी त्यांची जबाबदारी पार पाडत आहेत किंवा कसे यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी संबंधित कक्षाच्या कक्ष अधिकाऱ्यांवर सोपविण्यात येत आहे.

लिपिक-टंकलेखक संवर्गातील (रोखपाल, देयक लिपिक, गोपनिय लिपिक, मुख्य टंकलेखक, लिपिक-टंकलेखक) जे कर्मचारी टंकलेखनाचे काम करण्यास टाळाटाळ करतील तसेच संदर्भाधीन शासन निर्णयानुसार जबाबदारी पार पाडण्यात कसूर करतील असे लिपिक-टंकलेखक संवर्गातील कर्मचारी सदर पदावर काम करण्यास असमर्थ आहेत, अशी नोंद त्यांच्या सेवा अभिलेख्यांमध्ये घेण्यात येईल.

**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय



\\mls-dataserver\C Branch\१४०१\C-१०१\Local Disk (d)\E Drive\२०२२\Circular\Circular.doc

प्रति,

१) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी.

३) या सचिवालयातील लिपिक-टंकलेखक संवर्गातील सर्व कर्मचारी.

४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

५) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांनी सदरहू परिपत्रक या सचिवालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत आस्थापना कक्षास परिपत्रक निर्गमित झाल्याच्या तारखेपासून आठ दिवसात कळवावे.

६) निवडनस्ती.

\\mls-dataserver\C Branch\५३०५\C-५०५\Local Disk (d)\E Drive\२०२२\Circular\Circular.doc